अंतरी पेटवू ज्ञानज्योत

0350 उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

जा.क्र.उमवि\12\अं\ \97

दिनांक :- 29.10.1997

प्रति,
मा.परीक्षा नियंत्रक,
उमवि, जळगांव.

विषय :- स्पोर्टस् अँन्ड कल्चर अभ्यासमंडळाच्या सभेतील शिफारसींबाबत.

संदर्भ :- दिनांक 1.10.1997 रोजी संपन्न झालेली स्पोर्टस् अँन्ड कल्चर अभ्यासमंडळाची सभा.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विदित करण्यात येते की, दिनांक 1.10.1997 रोजी स्पोर्टस् अँन्ड कल्चर अभ्यासमंडळाची सभा विद्यापीठ कार्यालयात संपन्न झाली. सदर सभेने केलेल्या शिफारसी आपल्या माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविल्या आहेत.

कळावे ही विनंती.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव.

सोबत :- वरीलप्रमाणे.

प्रत माहितीसाठी रवाना :-

मा.उपकुलसचिव,
परीक्षा-पूर्वार्ध विभाग,
उमवि, जळगांव.

स्पोर्टस अॅन्ड कल्चर अभ्यासमंडळाच्या सभेतील शिफारशी

शिफारस क्र. 5.2 :-

आपल्या विद्यापीठाच्या बी.एड. विद्याशाखेमधील बी.एड. जनरल कडे शिकविणा-या प्राध्यापकांपैकी एकाची चेअरमन म्हणून बी.एड. (फिजिकल) च्या प्रात्यक्षिक परीक्षेकरीता निवड होते. हे संयुक्तीक नाही. बी.एड. जनरलच्या शिक्षकांकडे शारीरिक शिक्षणाची अर्हता नसते. त्यामुळे बी.एड. फिजिकलच्या प्रात्यक्षिक परीक्षेत त्यांना योग्य निर्णय घेता येत नाही याचा अनुभव जमेस धरुन ही सभा असा निर्णय घेत आहे की, चेअरमनची नियुक्ती ज्याला शिकविण्याचा पांच वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे अशा शिक्षकाची प्रात्यक्षिक परीक्षा करीता चेअरमन म्हणून नियुक्ती करावी.

शिफारस क्र. 5.3 :-

बी..एड. फिजिकलच्या पाचवा पेपर आशयासहीत अध्यापन पध्दती हा पेपर तपासणीसाठी बी.एड. जनरलच्या अध्यापकांची निवड केली जाते हे शारीरिक शिक्षण अध्यापकाच्या बाबतीत अन्यायकारक आहे. हा पेपर शिकविणारे शारीरिक शिक्षण अध्यापक यांची नियुक्ती केली जावी असा निर्णय ही सभा घेत आहे.

शिफारसक क्र. 5.4 :-

आपल्या विद्यापीठात एज्युकेशन फॅकल्टीमध्ये बी.एड. फिजिकल 1 ते 5 विषयासाठी अध्यापक नेमले जातात. परंतु त्यांचा चेअरमन हा बी.एड. जनरलकडील अध्यापकाची नियुक्ती केली जाते.. त्याऐवजी बी.एड. फिजिकलसाठी पेपर सेटरचा चेअरमन हा शारीरिक शिक्षण अध्यापक असावा असे सभेचे मत आहे.

शिफारस क्र. 5.5 :-

आपल्या विद्यापीठामध्ये अध्यादेश क्र. 163 च्या आशयानुसार पासिंगसाठी ग्रेस गुण 10 देण्यात येतात. विद्यार्थी नापास होत असल्यास त्या एखाद्या विषयात विशेष किंवा ग्रेस गुण दिले जातात. वरील प्रथम किंवा द्वितीय श्रेणीत गुण कमी पडत असल्यास या अध्यादेशाचा आधार घेण्यात येतो. नापास होणा-या विद्यार्थ्याला एखाद्या विषयासाठी जर गुण देय अध्यादेश नुसार 10 गुण द्यावयाचे असल्यास 10 गुणांच्या एकुण गुणात बेरजेत समावेश करण्यात यावा व गुणपत्रिकात एकुण गुणांमध्ये दाखवले जावेत.

dbs\akthar\gen\lett2